अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com । मंगळवार, दि. १८ जून २०२४ । ▶ वर्ष : २२ वे ▶ अंक : २५९ वा ▶ किंमत : ५ रुपये ▶ पाने १२

## लोकमंगल विहार येथे इसमाची गळफास घेऊन आत्महत्या

✔ **सोलापूर** : बाळे परिसरातील लोकमंगल विहार येथे राहण्यास असलेल्या एका ४८ वर्षीय इसमाने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना सोमवारी सकाळच्या सुमारास उघडकीस आली. शरद शिवाजी जाधव (वय ४८ रा. लोकमंगल विहार,बाळे) असे मयत झालेल्या इसमाचे नाव आहे. आज सकाळी १० वाजेच्या सुमारास त्याचा मृतदेह घरातील छताच्या पंख्याला साडीच्या सहाय्याने गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आला. या घटनेची नोंद फौजदार चावडी पोलिसात झाली असून या मागचे कारण समजले नाही. हवालदार घुगे पुढील तपास करीत आहेत.

## आम्रपाली चौकाजवळ दगडाने मारहाण; तरुण जखमी

✔ **सोलापूर** : विजापूर नाका परिसरातील आम्रपाली चौकाजवळ दगड आणि लाथा बुक्क्याने केलेल्या मारहाणी श्रीशैल सदानंद गायकवाड (वय २८ रा.सेटलमेंट फ्री कॉलनी नं.३) हा तरुण जखमी झाला. ही घटना रविवारी रात्रीच्या सुमारास घडली. श्रीशैल गायकवाड हा आम्रपाली चौकाजवळील हनुमान मंदिराजवळून जात होता. त्यावेळी बाप्पाराव गायकवाड, राजू गायकवाड आणि इतर ३ जणांनी मिळून त्याला दगड आणि लाथाबुक्याने मारहाण केली. त्याला जखमी अवस्थेत शुभम (भाऊ) यांनी शासकीय रुग्णालयात दाखल केले. या घटनेची नोंद विजापूर नाका पोलिसात झाली.

# गरिबीने छळले, पोटासाठी गाव सोडले
# रोजी-रोटीच्या घाईत काळाने गाठले

## ● विजेचा शॉक बसून पती, पत्नीसह मुलाचा अंत
## ● उ.सोलापूर तालुक्यातील खेड गावावर शोककळा

✔ उत्तर सोलापूर/प्रतिनिधी

**गरिबी अत्यंत वाईट असते,असे म्हणतात. ही गरिबी गरिबांनाच छळत असते.पण करणार काय. पोटासाठी तर धडपड करावीच लागते. छळणाऱ्या गरिबीवर मात करण्यासाठी उत्तर तालुक्यातील खेड येथील एका कुटुंबाने चक्क गावच सोडले. रोजी-रोटीच्या शोधात थेट पुण्याजवळील दापोडी गाठले.सोमवारची सकाळ त्यांच्यासाठी कर्दनकाळच ठरली. विजेच्या शॉक बसून घरातील कर्ते असणारे सुनील देविदास भालेकर (वय ४५) त्यांची पत्नी आदिका (४० वर्ष) व मुलगा परशुराम (वय १७ वर्षे, तिघेही रा.खेड, ता.उत्तर सोलापूर) या तिघांचा दोपोडीतील पत्र्याच्या घरात मृत्यू झाला.मन सुन्न करणारी ही घटना सोमवारी सकाळी आठ ते साडे आठच्या सुमारास घडली.ही वार्ता समजल्यानंतर खेड गावावर शोककळा पसरली.**





सुनील भालेकर



परशुराम भालेकर



आदिका भालेकर

ना घर ना दार. शेतीबाडी देखील नाही. खेड गावात शासनाकडून मिळालेले एकमेव घर. त्याच घरात वास्तव्य असायचे पण हाताला काम मिळत नव्हते. रोजची भूक कशी भागावाची हा प्रश्न रोज सतावत असे.

पुण्यात कामे मिळतात म्हटल्यानंतर सुनील यांनी पत्नी, एका मुलासह मुलीला घेवून दोन वर्षांपूर्वी दापोडी-कडेगाव गाठले. तिथे एका पत्राच्या खोलीत ते राहिले. पत्नी घर सांभाळायची आणि मुलगा परशुराम हा वडिलांना कामाच्या ठिकाणी मदत करीत असे. हा प्रकार पाहिल्यानंतर शेजाऱ्यांनी आक्रोश केला पण काहीच उपयोग झाला नाही.तिघेही चिरनिद्रेत गेले. क्षणात होत्याचे नव्हते झाले. सोमवारी सकाळी कामाला जाण्याची घाई. अंघोळ झाल्यानंतर सुनील हे घरापुढे असलेल्या तारेवर कपडे वाळू घालण्यासाठी गेले.

त्यांना विजेचा जोरदार शॉक बसला.त्यांना वाचवण्यासाठी पत्नी पुढे गेली. तिलाही शॉक बसला.आई वडिलांना वाचवण्यासाठी मुलगाही पुढे गेला. त्यालाही जबर धक्का बसला. विजेच्या धक्क्याने तिघांचा अंत झाला.

### सुदैव... कन्या ट्यूशनला गेली होती...

मुलगी वैष्णवी ही बारावीत आहे. सकाळी ती ट्यूशनला गेली होती.परत आल्यानंतर घरात तिघांचा मृतदेह पाहून तिची वाचाच बंद झाली.शेजाऱ्यांनी तिला धीर दिला.हा प्रकार खेडमध्ये असणाऱ्या आजीला कळवला.तेव्हा आजीने हंबरडाच फोडला.आजी आणि सुनील यांचा दुसरा मुलगा अभिजित हे दोघे खेडमध्येच राहातात.मुलगी वैष्णवी ही देखील वाचवण्यासठी गेली असती तर...

### तिघेही झाले पोरके..

सुनील यांचा दुसरा मुलगा अभिजीत याला गरीबीची जाणिव होती. बारावीपर्यंतचे शिक्षण पूर्ण करून त्याने एका किराणा दुकानात कामाला सुरूवात केली. त्यातून मिळणाऱ्या रोजगारातून तो स्वतःची गुजराण करायचा आणि आजीची देखभाल करायचा. आई-वडील व एक भाऊ निघून गेल्याने सुनील यांच्या आई जयाबाई,मुलगा अभिजित आणि मुलगी वैष्णवी हे तिघेही पोरके झाले आहेत.या तिघांचेही मृतदेह सायंकाळी सात वाजता दापोडीहून खेड या गावी आणण्यात आले.ग्रामस्थांच्या उपस्थितीत शोकाकूल वातावरणात त्यांच्यावर रात्री आठ वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले.

### असा उतरला होता प्रवाह...

भालेकर जिथे रहात होते,त्या पत्र्याच्या शेडपासून ते एका लोखंडी खांबाला तार बांधण्यात आली होती.पत्र्याच्या शेडवर असलेली वायर वाऱ्याने घासली गेली होती.वायरच्या आतील तारेतून हा प्रवाह शेड आणि घरासमोरील तारेत उतरला होता.भालेकर हे नेहमीप्रमाणे कपडे वाळत टाकायला गेले, शॉक बसला, असे सांगण्यात आले.

## दारूच्या नशेत फिनेल प्राशन

✔ **सोलापूर** : मौलाली चौक परिसरातील शिक्षक सोसायटीत राहणाऱ्या कुणाल शाहूराव आवारे (वय ३०) याने दारूच्या नशेत फिनेल प्राशन केले. ही घटना रविवारी (दि. १६) रात्री ११ वाजेच्या सुमारास घडली. त्याला उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. सदर बझार पोलिसात याची नोंद झाली आहे.

## विषारी पिवळे रंग प्राशन

✔ **सोलापूर** : विडी घरकुल परिसरातील सग्गम नगरात राहणाऱ्या पद्मावती गणेश बोल्लू (वय ४९) हिने अंगणात सडा मारण्याचे पिवळे विषारी रंग पिऊन आत्महत्येचा प्रयत्न केला. ही घटना रविवारी (दि.१६) रात्रीच्या सुमारास घडली. तिला उपचारासाठी वानेश्री (मुलगी) यांनी शासकिय रुग्णालयात दाखल केले. एमआयडीसी पोलिसात याची नोंद झाली असून या मागचे कारण समजले नाही.

# सोलापूर शहरातील पोलीस भरती प्रक्रियेला उद्या सुरुवात

## ● ५० जागांसाठी आले २ हजार ३०० अर्ज
## ● पारदर्शक भरती प्रक्रियेसाठी सोलापूर शहर पोलीस सज्ज
## ● पोलीस आयुक्त एम.राज कुमार यांची माहिती

✔ सोलापूर/प्रतिनिधी

सोलापूर पोलिस आयुक्तालय शहर पोलीस शिपाई पदाच्या ३४ आणि चालक पोलीस शिपाईच्या १६ पदासांठी एकूण २ हजार ३७४ अर्ज प्राप्त झाले आहेत. शहर पोलिस पदासाठी १५४० तर चालक पोलिस शिपाई पदासाठी ८३४ असे एकूण २ हजार ३७४ आवेदन अर्ज प्राप्त झाले आहेत. १९ जून ते २७ जानेवारी २०२४ पर्यंत भरती प्रक्रियेला पार पडणार आहे.

भरती प्रक्रिया पारदर्शक पध्दतीने पार पडावी यासाठी सोलापूर आयुक्ताल्य शहर पोलीस सज्ज झाले आहेत. उमेदवारांनी कोणत्याही आमिषाला बळी न पडता मैदानी आणि लेखी परिक्षा द्याव्यात असे आवाहन सोलापूर शहर पोलीस आयुक्त एम. राज कुमार यांनी केले आहे. पोलीस भरती प्रक्रियेच्या तयारीबाबत आढावा त्यांनी घेतला त्यानंतर पोलीस आयुक्तालयातील सभागृहात पत्रकार परिषद पार पडली. त्या प्रसंगी पोलिस आयुक्त एम.राज कुमार बोलत होते.

पहिल्या दिवशी उमेदवारांची मैदानी चाचणी होणार आहे. त्याच दिवशी येणाऱ्या उमेदवारांची भरती चाचणी संपवण्याचा प्रयत्न पोलीस प्रशासनाचा राहणार आहे. मैदानी





खेळासाठी प्रत्येक उमेदवारांना तीन संधी देण्यात येणार आहेत. त्यामुळे पहिल्या संधीचा फायदा घेता आला नाहीतरी, पुढील संधींचा त्याला फायदा घेता येणार आहे.

पुरुष उमेदवारांना १०० आणि १६०० मिटर धावणे, गोळा फेकणे हे इव्हेंट पार करावे लागणार आहेत, तर महिला उमेदवारांना १०० आणि ८०० मिटर धावणे आणि गोळा फेक हे इव्हेंट पार करावे लागणार आहे. प्रत्येक उमेदवारांच्या फेरीचे मार्क तक्त्यात भरून त्यावर अंमलदार स्वाक्षरी करणार आहेत. मैदानी खेळामध्ये उम ेदवारांना किती मार्क मिळाले आहेत. याची यादी दुसऱ्या दिवशी फलकावर तसेच वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात येणार आहे. त्यावर काही आक्षेप असल्यास सात दिवसात संबंधीत उमेदावर तक्रार देऊ शकतो. तसेच डमी उमेदवार टाळण्यासाठी बायोमॅट्रीक पडताळणी होणार आहे. प्रत्येक इव्हेंटचे व्हिडिओ रेकॉर्डींग होणार आहे. प्रत्येक इव्हेंटसाठी स्वतंत्र अधिकाऱ्याची नेमणूक करण्यात आली आहे. सरकारने दिलेल्या निर्देशाप्रमाणे आरक्षण पध्दती लागू राहणार आहे, असे पोलिस आयुक्त एम.राज कुमार यांनी सांगितले. या प्रसंगी पोलीस उपआयुक्त अजीत बोर्हाडे, साह्यक पोलिस आयुक्त राजन माने आदी पोलिस अधिकारी उपस्थित होते.

### पोलिसांची भरती प्रक्रियेवर राहणार करडी नजर

उमेदवार कोणत्याही आमिषाला बळी पडू नये. भरती प्रक्रियेचा सर्वांनीच पावित्र्य राखले पाहिजे. यासाठी सोलापूर शहर राज्य गुप्त वार्ता विभाग, लाचलुचपत विभाग यांच्यासह सायबर सेलची मदत घेतली जात आहे. उमेदवारांनी कोणत्याही आर्थिक व्यवहार करू नयेत. भरती प्रक्रियेसाठी नेमण्यात आलेल्या अधिकारी, अंमलदार यांचे अंडर टेकींग घेतले आहे. त्यामध्ये त्यांचा नातेवाईक या भरतीमध्ये समाविष्ट नसल्याबाबत त्यांच्याकडून लिहून घेण्यात आले आहे. तसेच मैदानी खेळावर नजर ठेवण्यासाठी सुरुवात ते शेवट या टप्प्यात सीसीटीव्ही कॅमेरा बसवण्यात आले आहेत. पोलीस अधिकारी, पोलीस अंमलदार हे देखील लक्ष ठेऊन असणार आहेत. साध्या वेशातील पोलीस प्रत्यक्षपणे मैदानावर हजर राहणार आहेत. सायबर सेल विविध समाज माध्यमांच्या पोस्ट, मेसेजवर नजर ठेवणार आहे.

### बंद पोलिस चौक्या महिन्याभरात सुरू करणार

सोलापूर शहरातील बंद असलेल्या पोलीस चौक्या पुन्हा एकदा सुरू करणार असल्याची माहिती पोलीस आयुक्त एम राजकुमार यांनी पत्रकारांशी बोलताना दिली. तत्कालीन पोलिस आयुक्त अंकुश शिंदे यांनी सोलापुरात रुजू झाल्यानंतर पोलिस चौक्यांमधून चालणारे कामकाज पूर्णपणे बंद करून ते कामकाज पोलिस ठाण्यांमधून चालू केले. पोलिस चौकीतून कर्मचारी गुन्हे दाखल करताना अनेक चुका व नागरिकांना त्रास देण्याचे काम करीत होते, हे वरिष्ठांच्या निदर्शनास आले होते त्यामुळे हा निर्णय घेण्यात आला होता. दरम्यान चार वर्षानंतर बंद झालेल्या पोलीस चौक्या सुरू करण्याचा निर्णय पोलीस आयुक्तालयाने घेतला आहे. धुळखात पडून असलेल्या पोलीस चौकी पुन्हा सुरू करण्यासाठी ठाकरे गटाच्या शिवसेनेसह नागरिक आणि काही सामाजिक संघटनांनी पोलीस आयुक्तांकडे मागणी केली होती. महिना दोन महिन्यात टप्प्याटप्प्याने सर्व पोलीस चौकी पुन्हा नागरिकांच्या सेवेत सुरू होतील अशी माहिती आयुक्त राजकुमार यांनी दिली.

# महापालिका वर्तुळात आयुक्तांच्या बदलीची चर्चा

## ● पदोन्नती मिळण्याची शक्यता

✔ **सोलापूर** : सोलापूर महापालिकेच्या पहिल्या महिला आयुक्त तथा प्रशासक शितल तेली उगले यांच्या पदोन्नतीने बदलीची जोरदार चर्चा महापालिका वर्तुळात सुरू आहे. मसुरी वरून प्रशिक्षण घेऊन आल्यानंतर त्यांची मंत्रालयात किंवा पुणे येथे बदली होणार असल्याची शक्यता वर्तवली जात आहे. चिमणी पाडकामासह विविध कारणास्तव त्यांची कारकिर्द वादग्रस्त आणि वैशिष्ट्यपूर्ण मानली गेली.



शितल तेली उगले यांनी नोव्हेंबर २२ मध्ये सोलापूरच्या आयुक्तपदाचा कार्यभार स्वीकारला होता. त्यांनी आपल्या कार्यकाळात महापालिका परिवहन विभागास प्राप्त झालेल्या पोलीस अनुदानापोटीच्या ३.५४ कोटी रुपये कर्मचाऱ्यांच्या देय रकमा वितरणाचा तत्काळ निर्णय घेऊन त्या रकमा अदा केल्या. दुहेरी जलवाहिनीच्या कामाचीही त्यांनी जोरदार पाठपुरावा केला. सिध्देश्वर कारखान्याची बहुचर्चित चिमणी उगले यांच्या कारकिर्दीतच पाडण्यात आली. त्यामुळे चिमणी पाडकामासह विविध कारणास्तव त्यांची कारकिर्द वादग्रस्त मानली गेली. या प्रकरणात त्यांचे सोलापूर विचारमंच्या पदाधिकाऱ्यांबरोबर खटकेही उडाले.

### अनेक लोकप्रतिनिधींची घेतली नाराजी

महापालिका आयुक्त उगले या लवकर कोणाला भेट देत नाहीत, याबाबत अनेकांच्या तक्रारीही होत्या. अनेकदा त्यांनी माजी नगरसेवकांनाही वेळ दिलेला नाही. त्यामुळे त्यांची नाराजी आयुक्तांवर होती. याशिवाय शहरातील पाणीपुरवठ्याप्रश्नी त्या अपयशी ठरल्या त्यामुळे भाजपचे पदाधिकारीही त्यांच्यावर नाराज होते. अनेकजण त्यांच्या बदलीची मागणी करत होते.

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे





या 'नीट' च नीटसं काही कळेना !

कल्याण

669-15-249

मुंबई

445-35-159

# आषाढीच्या महापूजेत मानाच्या पालखी प्रमुखांना पुन्हा मिळणार मान

✔ **पंढरपूर** : महाराष्ट्राची लोकदेवता पंढरपूरच्या श्री विठ्ठल- रुक्मिणी मातेच्या आषाढी एकादशीच्या म हापूजेसाठी मुख्यमंत्र्यांसमवेत आता राज्यातील मानाच्या दहा पालखी सोहळा प्रमुख व संस्थांचे अध्यक्ष यांना पुन्हा मान मि ळणार आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली सोमवारी मुंबईत झालेल्या बैठकीत निर्णय घेण्यात आला.

शासनाने आषाढी वारीसाठी सोहळ्यात चालणा-या सुमारे १५०० दिंड्यांना प्रत्येकी २० हजार रुपये अनुदान देण्याच्या निर्णयाचे राज्यातील दिंडी प्रमुखांनी या बैठकीत स्वागत केले.आषाढीच्या महापूजेचा मान मुख्यमंत्री यांच्याकडे असतो. त्यावेळी दर्शन रांगेतील पहिल्या वारकरी दाम्पत्याला महापूजेत सहभागी होण्याचा बहुमान दिला



जातो. पूर्वी श्री विठ्ठलाच्या पहाटेच्या महापूजेला राज्यातील मानाच्या पालखी सोहळ्यातील प्रमुख व संस्थान अध्यक्षांना बोलाविले जायचे. पुढे ती पध्दत बंद करण्यात आली. राज्यातील कानाकोप-यातून शेकडो किलोमीटरची पायपीट करुन लाखो वारकरी श्री विठ्ठलाच्या दर्शनाला येतात. या वारक-यांना विठुरायाचे साधे दर्शन सुध्दा होत नाही. या वारक-यांचे प्रतिनिधी म्हणून शासनाने राज्यातील मानाच्या दहा पालखी सोहळा प्रमुख व संस्थान अध्यक्ष यांना महापूजेला मंदिर समितीने निमंत्रीत करावे अशी मागणी केली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी याबाबत सकारत्मकता दर्शविली असून आषाढी वारी वारक-यांच्या दृष्टीने सुरक्षित व आनंददायी होण्यासाठी शासन सर्वतोपरी मदत करेल, असे सांगितले. आढावा बैठकीत झालेल्या निर्णयानुसार आषाढी शुध्द एकादशी सोहळा बुधवार दि. १७ जुलै रोजी होणार असून या दिवशी पहाटे २.२० वाजता श्री विठ्ठल रुक्मिणी मातेची शासकिय महापूजा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व मानाचे वारकरी यांच्या हस्ते सपत्नीक करण्यात येणार आहे.

**सन्मानपूर्वक निमंत्रित करणार** : आषाढी यात्रेच्या अनुषंगाने मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांनी नियोजन आढावा बैठक घेतली होती. या बैठकीमध्ये मानाच्या पालखीच्या विश्वस्तांनी शासकीय महापूजेसाठी मंदिरे समितीकडून निमंत्रण मिळावे अशी मागणी केली होती. त्यावर मंदीर समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी त्यांची मागणी मान्य करून या प्रमुख १० मानाच्या पालख्यांना प्रत्येकी दोन निमंत्रण पत्रिका देऊन सन्मानपूर्वक शासकीय महापूजेला आमंत्रित करण्याचा निर्णय घेतला आहे. यामध्ये श्री संत ज्ञानेश्वर महाराज, श्री संत तुकाराम महाराज, श्री संत एकनाथ महाराज, श्री संत निवृत्ती महाराज, श्री संत सोपान देव महाराज, श्री संत मुक्ताई, श्री संत नामदेव महाराज, श्री विठ्ठल रुक्माई संस्थान कौंडण्यपूर, श्री संत चांगावटेश्वर महाराज, श्री संत निळोबाराय महाराज या प्रमुख १० मानाच्या पालख्यांचा समावेश आहे.

> “ आषाढी यात्रा एकादशीच्या महापूजेसाठी मंदिरामध्ये उपस्थित राहण्यासाठी मानाच्या १० पालकांचे अध्यक्ष व प्रतिनिधी यांना दोन पाचची तरतूद करण्यात आली आहे तसेच मुख्यमंत्री सहकुटुंब खासदार आमदार हेही उपस्थित असतात. मंदिराच्या चार खांबी १६ खांबी येथे ६० ते ७० लोक उपस्थित राहू शकतात त्याचे नियोजन मंदिर समिती व प्रशासन करणार आहे. ”
>
> **- राजेंद्र शेळके**
>
> कार्यकारी अधिकारी, विठ्ठल रुक्मिणी मंदिर समिती